(सविस्तर जाहिरात प्रारुप)

**जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय जालना**

**जाहिरात क्रमांक 2016/मशाका-1/आस्था-1/ससेभ/प्र.क्र., दिनांकः 16.08.2016**

**सरळसेवा भरती-2016**

शासन पत्र महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र.भरती-2015/प्र.क्र.403/ ई-7, दिनांक 23 जुन 2016 अन्वये महसुल विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयातील लिपीक टंकलेखक व तलाठी संवर्गात सरळसेवेची रिक्त असलेली पदे शासन निर्णय वित्त विभाग दिनांक 02.06.2015 व दिनांक 15.01.2016 मध्ये दिलेल्या तरतूदीनूसार भरण्याची कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

महसुल विभागाच्या उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील व जालना जिल्हा महसुल विभागाच्या आस्थापनेवरील लिपीक टंकलेखक व शिपाई तसेच सह जिल्हा निबंधक जालना यांचे आस्थापनेवरील लिपीक टंकलेखक संवर्गातील रिक्त पदे भरतीसाठी खालील नमूद प्रवर्गातील पात्र उमेदवारांकडुन विहीत नमूण्यातील अर्ज फक्त ऑनलाईन (**Online**) पध्दतीने **www.Jalna.nic.in** या संकेतस्थळावर मागविण्यात येत आहे.

**चलनव्दारे परिक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून दिनांक 26.08.2016 पर्यंत राहील व परिपूर्ण ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक 27.08.2016 रोजी सायं.5.45 पर्यंत राहील.**

अर्जदाराने **Online** अर्ज भरतांना वस्तुनिष्ठ व अचूक माहिती भरावी तसेच **Online** अर्जासोबत कोणतेही प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे जोडण्यात (अपलोड) करण्यात येवू नयेत. **Online** भरलेल्या माहितीच्या आधारे (मुळ कागदपत्रे तपासणीच्या आधीन राहून) उमेदवारांची निवड करण्यात येईल. तसेच निवड केल्यानंतर भविष्यात **Online** अर्ज करतांना सादर केलेली माहिती चुकीची/खोटी/दिशाभूल करणारी आढळून आल्यास संबंधिताची निवड रद्द करण्यात येईल. त्याचप्रमाणे **Online** अर्ज करतांना आपल्या सर्व शैक्षणिक व इतर बाबीची पुर्ण माहिती नमूद करावी. **Online** भरलेल्या माहिती व्यतिरिक्त इतर गुणवत्ता व माहितीची प्रमाणपत्र / कागदपत्रे नंतर कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतली जाणार नाहीत, याची विशेष नोंद घ्यावी.

1) **लिपीक-टंकलेखक संवर्ग वेतनश्रेणी-रु. 5200-20200 (ग्रेड पे वेतन रु.1900) एकूण रिक्त पदाची संख्या (06)**

**(महसूल आस्थापना)**

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण | समातंर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| | | महिला | |
| अनु जाती | 01 | 00 | 01 |
| अनु जमाती | 02 | 01 | 01 |
| भ ज क | 01 | 00 | 01 |
| इमाव | 01 | 00 | 01 |
| खुला | 01 | 00 | 01 |
| एकूण | 06 | 01 | 05 |

लिपीक-टंकलेखक संवर्ग वेतनश्रेणी-रु. 5200-20200 (ग्रेड पे वेतन रु.1900) एकूण रिक्त पदाची संख्या (06)

(सह जिल्हा निबंधक,आस्थापना)

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण | समातंर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| | | महिला | |
| विजा अ | 01 | 00 | 01 |
| इमाव | 01 | 00 | 01 |
| खुला | 04 | 02 | 02 |
| एकूण | 06 | 02 | 04 |

तलाठी संवर्ग वेतनश्रेणी-रु. 5200-20200 (ग्रेड पे वेतन रु.2400) एकूण रिक्त पदाची संख्या ( 12 )
(उपविभागीय अधिकारी आस्थापना)

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण | | | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|---|---|
| | | महिला 30% | माजी सैनिक 15% | पदवीधर/पदविधारक अंशकालीन उमेदवार 10% | |
| अनु जाती | 02 | 01 | 00 | 00 | 01 |
| अनु जमाती | 02 | 01 | 00 | 00 | 01 |
| भ ज ब | 01 | 00 | 00 | 00 | 01 |
| भ ज क | 01 | 00 | 00 | 00 | 01 |
| भ ज ड | 01 | 00 | 00 | 00 | 01 |
| खुला | 05 | 01 | 01 | 01 | 02 |
| एकूण | 12 | 03 | 01 | 01 | 07 |

शिपाई संवर्ग वेतनश्रेणी-रु. 4440-7440 (ग्रेड पे वेतन रु.1300) एकूण रिक्त पदाची संख्या (05)
(महसूल आस्थापना)

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समातंर आरक्षण | समातंर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| | | महिला | |
| अनु जाती | 01 | 00 | 01 |
| विजा अ | 01 | 00 | 01 |
| इमाव | 01 | 00 | 01 |
| खुला | 02 | 01 | 01 |
| एकूण | 05 | 01 | 04 |

टिपः-

1. नियुक्ती देण्याच्या पदसंख्येत व आरक्षणात बदल करण्याचे पूर्ण अधिकार जिल्हा निवड समिती यांच्याकडे राखीव आहेत. जिल्हा निवड समिती यांचा निर्णय अंतिम राहिल.

2.वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.असंक/1025/प्र.क्र.21/भाग-, दि.24.01.2006 अन्वये शासनाने विभागीय स्तरावर निर्माण केलेले अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे उमेदवार उपलब्ध झाल्यास त्याप्रमाणे पदे कमी होण्याची शक्यता आहे.

3. महिला व बाल कल्याण विभागाचे शासन निर्णय क्र.82/2001/अंसेआ-2000/प्र.क्र.415/का-2, दि.25.05.2001 मधील तरतूदीनुसार महिलांचे आरक्षण दर्शविण्यांत आलेले आहे.

4. समांतर आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीस लागू राहील, समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत आरक्षण असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येणार नाहीत.

2) शैक्षणिक अर्हताः-

(अ) लिपीक-टंकलेखक संवर्गः-

(अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) उतीर्ण किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण

(ब) मराठी 30 शब्द प्रती मिनीट किंवा इंग्रजी 40 शब्द प्रती मिनिट टंकलेखन परीक्षा हि शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा उतीर्ण असणे आवश्यक आहे.

(क) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.निवक-1010/प्र.क्र.08/2010/16,अ, दि.06.10.2010 अन्वये प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, स्वातंत्र सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य, सन-1991 चे जनगणना कर्मचारी, सन-1994 नंतरचे निवडणुक कर्मचारी व पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन कर्मचारी या सर्व घटकातील उमेदवारांना जर त्यांना लिपीक टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली तर टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासुन 06 महिने इतक्या कालावधीची मुदत देय राहील.

(ड) उमेदवाराने महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.)विभागाकडील शासन निर्णय दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्या पैकी संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.संगणक परीक्षा उत्तीर्ण नसल्यास शासन निर्णय दि.19.3.2003 मधील तरतूदीनूसार पात्र उमेदवारास त्याच्या नियूक्तीच्या दिनांकापासून 2 वर्षाच्या आत संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील तसे न केल्यास त्यांची सेवा अपोआप समाप्त होईल.

(ब) तलाठी संवर्ग :-

(अ) संविधानिक विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण किंवा शासनाने त्यांच्याशी समतुल्य केलेली अन्य अर्हता

(ब) उमेदवाराने महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय दिनांक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्या पैकी संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. संगणक परीक्षा उत्तीर्ण नसल्यास शासन निर्णय दि.19.3.2003 मधील तरतूदीनूसार पात्र उमेदवारास त्याच्या नियूक्तीच्या दिनांकापासून 2 वर्षाच्या आत संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील तसे न केल्यास त्यांची सेवा अपोआप समाप्त होईल.

(ड) शिपाई संवर्ग :-

(अ) मान्यताप्राप्त शाळेची किमान इयत्ता चोथी परीक्षा उत्तीर्ण व लिहीता वाचता येणे व मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

3) वयोमर्यादाः

1. सर्वसाधारणतः उमेदवाराचे वय दिनांक 17/08/2016 रोजी किमान 18 वर्ष पूर्ण असावे व 38 वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीय उमेदवारासाठी 5 वर्षाची शिथीलता राहील)
2. मार्जी सैनिक उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्ष इतकी राहील तसेच अपंग माजी सैनिकासाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षे राहील.
3. उच्च गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा 05 वर्षापर्यंत शिथील.
4. सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक 27.10.2009 नुसार पदवीधर अंशकालीन उमेदवारासाठी 3 वर्ष अंशकालीन म्हणून काम केलेल्या उमेदवारांना कमाल वयोमर्यादा 46 वर्ष राहील.
5. 1991 चे जनगणना कर्मचारी / स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य व सन 1994 नंतरचे निवडणुक कर्मचारी उमेदवारांकरिता शासन निर्णयातील तरतुदीनुसार 45 वर्ष वयाची अट राहील.
6. अपंग उमेदवारासाठी शासकीय निर्णयानुसार कमाल वयोमर्यादा 45 वर्षे.
7. प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त उमेदवारासाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार कमाल वयोमर्यादा 45 वर्ष राहील.

4) माजी सैनिक उमेदवारांसाठी:-

1. शा.सा.प्र.विभाग परिपत्रक दि.10/10/80 व दि.16/4/81 नुसार माजी सैनिक म्हणून शासन सेवेकरिता पात्र उमेदवार असावा.
2. शासन सामान्य प्रशासन विभागकडील निर्णय दि.08.06.1993 मधील तरतूदीनुसार माजी सैनिक उमेदवाराने माजी सैनिक या समांतर घटकाच्या आरक्षणाचा पुर्वी लाभ घेवून, शासकिय सेवेत नोकरी स्विकारली असेल तर तो पुन्हा समांतर आरक्षणाच्या लाभास पात्र राहणार नाही. केवळ वयाची सवलत घेण्यास तो पात्र राहील.
3. युध्दकाळात किंवा युध्द सुरु असतांना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबातील फक्त एका व्यक्तीला त्यानंतरच्या पसंतीक्रमाने आरक्षित पदापैकी उपलब्ध पदाकरिता अर्ज करता येईल व त्यास सक्षम अधिका-याचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

5) महिला उमेदवाराकरिता :-

1. उन्नत आणि प्रगत गटाचे (क्रिमीलेयर) चे तत्व अनुसूचित जाती/जमाती व्यतिरिक्त सर्व प्रवर्गांना लागू असल्याने उन्नत/ प्रगत गटात मोडत नसल्याचे सन 2015-16 या वर्षातील नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राची प्रत अर्जदाराकडे असणे आवश्यक आहे. जे अर्जदारास मुळ कागदपत्राच्या छाननी वेळी सादर करणे बंधनकारक राहील.
2. महिला करिता 30 टक्के आरक्षणाचा लाभ घेणा-या खुल्या प्रवर्गातील महिलासाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र मुळ कागदपत्राच्या छाननी वेळी सादर करणे बंधनकारक राहील
3. महिला उमेदवारांच्या बाबतीत शैक्षणिक कागदपत्रानुसार उमेदवारांचे अर्जात नांव नमुद करणे अपेक्षित आहेत.

6) शुल्क (फी) :-

(अ) सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक दिनांक 11 मार्च 2015 मधील तरतूदीनूसार स्पर्धा परीक्षा भरती प्रक्रियेसाठी खालील प्रमाणे परीक्षा शुल्क राहील.

| अ.क्र | संवर्ग | शुल्क फी | |
|---|---|---|---|
| | | राखीव प्रवर्ग | खुला प्रवर्ग |
| 01 | लिपीक-टंकलेखक | 150/- | 300/- |
| 02 | तलाठी | 150/- | 300/- |
| 03 | शिपाई | 150/- | 300/- |

(ब) वरीलप्रमाणे परीक्षा शुल्क हे ना-परतावा राहील. बँक चार्जेस उमेदवाराने भरणा करणे आवश्यक राहील.

(क) शुल्का संबधी विशेष सुचना- वरील **Online** शुल्का व्यतिरिक्त धनाकर्ष / धनादेश इंडीयन पोस्टल ऑर्डर इत्यादी कोणत्याही माध्यमाव्दारे परीक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही. फक्त **Online** स्टेट बँक ऑफ इंडीया बँकेच्या शाखेतील विहीत चालान व्दारे भरणा केलेले शुल्कच ग्राहय धरले जाईल. इतर बँकेमार्फत भरलेले चालान यांचा क्रमांक **Journal No.** मध्ये टाकल्यास, पडताळणी करतेवेळेस सदर उमेदवारास अपात्र करण्यात येईल याची विशेष नोंद घ्यावी.

(ड) परीक्षा शुल्क हे बँक चालानच्या स्वरुपात सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी जालना यांचे नांवाने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कुठल्याही शाखेत चालनव्दारे खाते क्रमांक 33162911185 वर जमा करणे आवश्यक आहे.

(इ) माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू राहणार नाही.

(फ) मागासवर्गीय उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातून अर्ज केल्यास त्यांना खुल्या प्रवर्गातील उमेवारांसाठी असलेली परीक्षा शुल्क भरणा करणे आवश्यक आहे.

7) अर्ज सादर करण्याचा व लेखी परीक्षेचा दिनांक

| अ.क्र. | पदाचे नांव | लेखी परीक्षेचा दिनांक | वार | लेखी परीक्षेची वेळ | अर्ज इंटरनेटवर भरण्याचा शेवटचा दिनाक |
|---|---|---|---|---|---|
| 01 | लिपिक-टंकलेखक | 04सप्टेंबर 2016 | रविवार | 10.30 ते 12.30 | चलनव्दारे परिक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक जाहिरात प्रसिध्द झाल्या पासून दिनांक 26.08.2016 पर्यंत राहील व परिपूर्ण ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक 27.08.2016 रोजी सायं. 5.45 पर्यंत राहील. |
| 02 | शिपाई | 04सप्टेंबर 2016 | रविवार | 10.30 ते 12.30 | |
| 03 | तलाठी | 11 सप्टेंबर 2016 | रविवार | 10.30 ते 12.30 | |

8) अर्ज सादर करणे बाबत आवश्यक सूचना

1) उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रीत करण्यात येणार आहे. परीक्षेसाठी विहीत केलेला अर्ज **www.jalna.nic.in** या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. त्यावर असलेल्या अर्जात माहिती भरुन स्वतःचे अलिकडच्या काळातील योग्य आकाराचे छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड करावी. व इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदणी क्रमांक जपुन ठेवावा. अर्ज भरावयास सुरुवात करण्या अगोदर परीक्षा शुल्क चालानव्दारे भरणे आवश्यक आहे. बँक चालानचा नमुना **www.jalna.nic.in** संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट करुन घ्यावा व त्यातील आवश्यक माहिती भरुन आवश्यक परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या शाखेत जमा करावे व चालानची प्रत जपून ठेवावी. या नंतर **Online** अर्ज भरावा अर्जात परीक्षा शुल्क भरणा केल्याचा तपशिल अचूक नोंदवावा. अर्ज पुर्ण भरणे झाल्यावर त्याची प्रिंट काढून जपून ठेवावी.

2) उमेदवाराला कोणत्याही वेब सेंटर वर किंवा उपलब्ध असलेल्या कोणत्याही इंटरनेट सुविधा संगणकावर ऑनलाईन अर्ज भरता येईल.

3) उमेदवारांनी माहिती भरण्यापूर्वी बँक चालान तयार करुन, सोबत ठेवावी म्हणजे चालान बाबतची माहिती आवेदन पत्रावर भरता येईल. त्याशिवाय इंटरनेटवर अर्ज भरता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

4) परीक्षा प्रवेशपत्र **www.jalna.nic.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यामूळे अर्ज भरल्यानंतर इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदणी क्रमांक जपून ठेवावा. परीक्षा प्रवेशपत्र आवेदन स्विकारण्याच्या अंतीम दिनांकानंतर उपलब्ध होतील. प्रवेशपत्र इंटरनेट वरुन प्राप्त करुन, घेण्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

5) ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना कागदपत्राच्या छाननीशिवाय लेखी परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यामूळे उमेदवार परीक्षा पास झाला तरी, केवळ परीक्षा पास झाल्यामूळे उमेदवारास कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. लेखी परीक्षेत पात्र ठरणा-या उमेदवाराचे बाबतीत त्याचे अर्जातील तपशिल, मुळ कागदपत्राची पडताळणी करुन अटी शर्तीची पुर्तते बाबत तपासणी करण्यात येईल.

## 9) :- निवड पध्दती :-

अ) लिपीक-टंकलेखक पदाकरिता

1. शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र.प्रनिमं.2007/प्र.क्र.46/07/13/अ दि.19.10.2007 मधील तरतुदी नुसार लिपीक पदासाठी उमेदवाराची निवड करतांना मुलाखती न घेता फक्त 200 गुणाची लेखी परीक्षा घेण्यात येईल व लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणाच्या आधारावर गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.
2. सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.प्रानिम 2007/प्र.क्र.46/07/13-अ, दिनांक 19 ऑक्टोबर,2007 व दि.05 जून 2014 नूसार, ज्या पदाकरिता माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता 10 वी) आहे अशा पदाकरिता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयावरील प्रश्नाकरीता प्रत्येकी 50 गुण ठेवुण एकूण 200 गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. सदरील लेखी परिक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची असेल.
3. लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या अधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांनी शैक्षणीक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करून द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
4. सदर पदासाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणाच्या किमान 45% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
5. उमेदवारास समान गुण मिळाल्यास परीक्षेत ज्या उमेदवाराना समान गुण असतील, अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक 05.10.2015 मधील नमूद निकषावर क्रमवार लावला जाईल.

ब) तलाठी पदाकरीता

1. शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र.प्रनिमं.2007/प्र.क्र.46/07/13/अ दि.19.10.2007 व दि.05.06.2014 तसेच शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. क्र.प्रनिमं.2009/प्र.क्र.356/ई-10, दि.01.01.2010 मधील तरतुदी नुसार तलाठी पदासाठी उमेदवाराची निवड करतांना मुलाखती न घेता फक्त 200 गुणाची लेखी परीक्षा घेण्यात येईल व लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणाच्या आधारावर गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.
2. सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.प्रानिम 2007/प्र.क्र.46/07/13-अ, दिनांक 19 ऑक्टोबर,2007 व दि.05 जून 2014 नूसार ज्या पदाकरिता पदवी हि कमीत कमी अर्हता आहे. अशा पदाकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील.

   परंतू मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रीकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता 12 वी) च्या दर्जाच्या समान राहिल. व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौधीक चाचणी या विषयावरील प्रश्नाकरीता प्रत्येकी 50 गुण ठेवुण एकूण 200 गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. सदरील लेखी परिक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची असेल.
3. लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या अधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांनी शैक्षणीक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करून द्यावी लागतील.अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
4. सदर पदासाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणाच्या किमान 45% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
5. उमेदवारास समान गुण मिळाल्यास परीक्षेत ज्या उमेदवाराना समान गुण असतील, अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभाग, शासननिर्णय दिनांक 05 ऑक्टोबर 2015 मधील नमूद निकषावर क्रमवार लावला जाईल.

(ग) शिपाई संवर्ग -

1. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक 05.10.2015 नूसार शिपाई पदाकरीता 100 गूणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.लेखी परिक्षेसाठी वस्तूनिष्ट,बहूपर्यायी स्वरूपाचे 50 प्रश्न असतील सदर प्रश्न संबंधित पदाकरीता विहीत करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या स्तरावर असतील.

**10) सर्वसाधारण अटी व शर्ती : -**

1. उक्त पदांसाठी आवश्यक अर्हता प्राप्त करणा-या संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकेल.
2. मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. निवड होणा-या मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सहा महिन्याच्या आत दाखल करणे आवश्यक राहील. अन्यथा मुदतीनंतर जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधिताची नियूक्ती आपोआप संपूष्टात येईल.
3. अनुसुचित जाती /अनुसुचित जमाती वगळून अन्य मागासवर्गीय उमेदवारांसाठी सन 2015-16(31 मार्च 2016 रोजी संपलेल्या अर्थिक वर्षाचे) या वर्षाचे उत्पन्न व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जदाराकडे असणे आवश्यक आहे. जे अर्जदारास मुळ कागदपत्राच्या छाननी वेळी सादर करणे बंधनकारक राहील. नॉन क्रिमीलीअरचे तत्व अनुसूचित जाती / अनुसुचित जमातीच्या आणि खुला प्रवर्ग व्यतिरिक्त अन्य सर्व मागास प्रवर्गाना लागू राहील.
4. शासन वित्त विभाग निर्णय क्रं अनियो/10/05/126/सेवा 4, दि.31.10.2005 नुसार दिनांक 01.11.2005 रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवाराचा नविन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम 1982 व म.ना.से.(निवृत्तीवेतनचे अंशराशीकरण) नियम 1984) आणि सद्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधी योजना लागू होणार नाही.
5. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन परिपत्रक दि. 01.07.2005 नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 नुसार सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे. परंतु सदरील प्रक्रिया ही **Online** पध्दतीची असल्यामूळे अर्ज भरतांना उमेदवारांकडून हे प्रमाणपत्र स्वाक्षरीत करुन घेणे शक्य नाही करीता **Online** अर्ज भरतांना अचूक अपत्य संख्या नमूद करावयाची आहे.
6. भरती प्रक्रिया ही **Online** पध्दतीने असल्याने, अर्जदाराने माहिती भरतांना अचूक, खरी/ जी कागदपत्रे / प्रमाणपत्रे उपलब्ध आहेत अशीच माहिती भरावी. चूकीची / खोटी / दिशाभूल करणारी / अन्य इसमाची/ नंतर उशिराने कागदपत्रे / प्रमाणपत्रे उपलब्ध होणारी माहिती भरल्यास, व भविष्यात निदर्शनास आल्यास अथवा अशा उमेदवाराची निवड झाल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल. व शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येईल.
7. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची नोद अर्जात करावी.
8. शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभागप्रमुखांच्या परवानगीने भरावे. व निवड झाल्यास अशा परवानगीची प्रत कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करावी.
9. एक अथवा सर्व अर्ज नाकारण्याचा, निवड प्रक्रियेत वेळेवर होणारा बदल तसेच अंतिम निर्णय इत्यादी बाबतचे संपूर्ण अधिकार जिल्हा निवड समिती / नियुक्ती अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.
10. उमेदवाराने एकदा समांतर आरक्षणांचा लाभ घेतला असल्यास त्याच उमेदवारास पुन्हा समांतर आरक्षणांचा लाभ घेता येणार नाही.
11. लेखी परीक्षेस येण्या जाण्याचा खर्च उमेदवारास स्वतः करावा लागेल.
12. उमेदवाराने त्यांच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

13. निवड झालेल्या उमेदवारांची जालना जिल्हा महसूल आस्थापनेच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयात कोठेही नियूक्ती केली जाईल.
14. न्यायालयीन निर्णयाच्या आधिन राहून सदर पदे भरण्याची कारवाही करण्यात येईल.
15. परीक्षा उत्तीर्ण होऊनही अर्जदार जर पात्रतेच्या अटी,अर्ज सादर करण्याच्या दिनांकापर्यन्त पुर्ण करीत नसेल,असे आढळल्यास त्याची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होण्यास पात्र असेल व त्यास त्याचा दावा सांगता येणार नाही.
16. पदसंख्येत व आरक्षणात कमी / अधिक बदल होऊ शकतो.

दिनांक :- 16/08/2016
स्थळ :- जालना

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा,
निवासी उपजिल्हाधिकारी,जालना

-स्वाक्षरीत/-
अध्यक्ष,
जिल्हा निवड समिती तथा,
जिल्हाधिकारी जालना.